**ठळक बातम्या**

- देशात पावणे २ लाख क्विंटलचा बियाणे साठा निर्माण केल्याची केंद्रीय कृषीमंत्र्यांची माहिती

- ३१ ऑगस्ट २०२८ पूर्वी TET उत्तीर्ण होणं शिक्षकांसाठी बंधनकारक

- देशात एलपीजीचा ३० दिवसांचा राखीव साठा निर्माण करण्याचे पेट्रोलियम मंत्रालयाचे निर्देश

**आणि**

- आयपीएलच्या पात्रता फेरीत गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॅयल्स यांच्यात सामना सुरू

<><><><><><>

शेतकऱ्यांना बियाण्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी १ लाख ७४ हजार क्विंटलचा राष्ट्रीय बियाणे साठा स्थापन करण्यात आल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली आहे. ते आज नवी दिल्लीत खरीप हंगाम २०२६साठी आयोजित राष्ट्रीय कृषी परिषदेच्या दुसऱ्या दिवशी माध्यमांशी बोलत होते. देशाचे एकूण अन्नधान्य उत्पादन अंदाजे ३७ कोटी ६० लाख टनांपेक्षा जास्त झालं असून, ते आतापर्यंतचं सर्वाधिक उत्पादन आहे, अशी माहिती चौहान यांनी दिली. आतापर्यंत ९ लाख ७६ हजार शेतकरी ओळखपत्रं तयार करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांना आता विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी वेगळ्या कागदपत्रांची गरज भासणार नाही, असं चौहान म्हणाले. खत वितरणात पारदर्शकता, काळाबाजार रोखणे आणि खऱ्या शेतकऱ्यांना योग्य पुरवठा सुनिश्चित करण्याची गरज असल्याचं चौहान म्हणाले.

<><><><><>

सध्या सेवेत असलेल्या सर्व शिक्षकांसाठी 'शिक्षक पात्रता चाचणी' TET उत्तीर्ण होणे अनिवार्य असून त्यासाठी शिक्षकांना दिलेली मुदत ३१ ऑगस्ट २०२८ पर्यंत वाढवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज दिले आहेत. शिक्षकांना चाचणी उत्तीर्ण होण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून मुदतवाढ देण्याचे तसेच ही परीक्षा वर्षातून दोनदा घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

शिक्षकांच्या सेवाशर्तींमध्ये अंतर्भाव नसल्याचं कारण देत अनेक शिक्षकांनी TET बंधनकारक करण्याच्या निर्णयाला आव्हान दिलं होतं. ते सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावलं.

<><><><><>

नीट परीक्षेसारख्या प्रकरणात जबाबदारी निश्चित केली पाहिजे असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. नीटचे पेपर फुटल्यानंतर दाखल झालेल्या याचिकासमूहावर न्यायमूर्ती पी एस नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठासमोर सुनावणी सुरु झाली. नीट परीक्षेबाबत वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा घेण्याकरता वेगळी सशक्त आणि स्वायत्त यंत्रणा तयार करावी किंवा सध्याच्या राष्ट्रीय परीक्षा संस्थेमधे आमूलाग्र बदल करावा, अशी मागणी यातल्या एका याचिकेत केली आहे. येत्या २१ जून रोजी फेरपरीक्षा होणार असून त्यावेळी काही गैरप्रकार होऊ नयेत याकरता विशेष उपाययोजना केल्या आहेत, प्रधानमंत्री स्वतः या प्रक्रीयेवर लक्ष ठेवून असल्याचं महाअधिवक्ता तुषार महेता यांनी सांगितलं. मात्र जबाबदारी निश्चित करणारा आणि अशा परीक्षांच्या प्रक्रीयेत सुधारणा करण्याबाबत सविस्तर जबाब दाखल करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्रसरकारच्या मनुष्यबळविकास मंत्रालयाला दिले.

<><><><><>

एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं, नीट-यूजी परीक्षेसाठीचा शुल्क परतावा मिळण्याकरता बँक खात्याचे तपशील सादर करण्याची अंतिम मुदत २२ जूनपर्यंत वाढवली आहे. आधी ही मुदत २६ मे पर्यंत होती. मात्र, नोंदणी केलेल्या

२३ लाख विद्यार्थ्यांपैकी केवळ १३ लाख विद्यार्थीच त्या मुदतीत तपशील सादर करू शकले होते.

त्या अनुषंगानं ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप तपशील सादर केले नाहीत त्यांना ही प्रक्रिया पूर्ण करणं सुलभ व्हावं या उद्देशानं ही मुदतवाढ दिल्याचं एनटीएनं  स्पष्ट केलं.

<><><><><>

भारताने माता आणि बाल आरोग्य, पोषण आणि आर्थिक संरक्षण या क्षेत्रात वेगाने प्रगती केल्याचं आज प्रसिद्ध झालेल्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात म्हटलं आहे. या सर्वेक्षणानुसार ९५ पूर्णांक ९ दशांश टक्के गर्भवती महिलांची प्रसुतीपूर्व काळजी घेण्यात आली, तर गरोदरपणाच्या पहिल्या तिमाहीत सरकारी मदत  घेणाऱ्या मातांचे प्रमाण ७० टक्क्यांवरून ७६ पूर्णांक २ दशांश टक्क्यांपर्यंत वाढलं आहे. भारताचा एकूण प्रजनन दर २ टक्क्यांवर कायम असून १ वर्षापासून ते दोन वर्षांपर्यंतच्या वयोगटातल्या मुलांच्या लसीकरणाचं प्रमाण ९६ टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचं सर्वेक्षणात नमूद आहे. या सुधारणा सरकारच्या विविध उपक्रमांचा सातत्यपूर्ण प्रभावच दर्शवत असल्याचं आरोग्य मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त नवी दिल्लीत 'तंबाखू-मुक्त शैक्षणिक संस्था- ToFEI' या ॲपच्या प्रायोगिक आवृत्तीचं अनावरण आज केंद्रीय आरोग्य सचिव पुण्यसलीला श्रीवास्तव यांच्या हस्ते झालं. देशभरातल्या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये तंबाखुसंबंधित नियमांची अंमलबजावणी आणि देखरेख सुनिश्चित करणं हा या ॲपचा उद्देश आहे.

<><><><><>

देशात एलपीजीचा ३० दिवस पुरेल इतक्या राखीव साठा करण्याचे निर्देश सरकारने पेट्रोलियम कंपन्यांना दिल्याचं पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी  म्हटलं आहे.  नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत त्या बोलत होत्या.

<><><><><>

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारू प्यायल्यामुळे आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये ७ जणांचा मृत्यू झाला असून दापोडी, फुगेवाडी, काळे पडळ आणि हडपसर परिसरातही ५ जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी आतापर्यंत ८ जणांना अटक केली आहे.

<><><><><>

जागतिक आव्हानांचा सामना करत देशाच्या अर्थव्यवस्थेनं गेल्या आर्थिक वर्षात ७ पूर्णांक ६ दशांश टक्के वृद्धीदर गाठल्याचं रिझर्व बँकेच्या वार्षिक अहवालात म्हटलं आहे. २०२५-२६चा वार्षिक अहवाल भारतीय रिझर्व बँकेनं आज प्रसिद्ध केला. सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था हे स्थान भारतानं या वर्षातही कायम राखलं. जागतिक स्तरावर इंधन दरवाढ, पुरवठा साखळीतले व्यत्यय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतल्या समस्या ही आव्हानं असली तरी भारतीय अर्थव्यवस्था मजबूत पायावर उभी असल्यानं पुढच्या काळात आर्थिक वाढीला चालना मिळेल, असं अहवालात म्हटलं आहे. २०२६-२७ मधे महागाई दर ४ टक्क्यावर रोखण्याचं उद्दिष्ट अहवालात नमूद केलं आहे.

थेट लाभ हस्तांतरण योजनांचा निधी डिजिटल चलनाच्या स्वरुपात वितरित करण्याचा विचार असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.२०२५-२६ या वर्षात आर्थिक फसवणुकीची १० हजार ११४ प्रकरणं उघडकीस आली, त्यात सुमारे ४८ हजार २१ कोटी रुपयांची फसवणूक झाली होती, अशी माहिती अहवालात दिली आहे.

<><><><><>

भारत चीन सीमा व्यवहार समन्वय कृती समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत सीमापार नद्यांचं व्यवस्थापन आणि सहकार्यासंबंधी सकारात्मक चर्चा झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी म्हटलं आहे. ते आज नवी

दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. सीमेवरच्या नद्यांच्या पाणी व्यवस्थापन संबंधात लवकरच एक तज्ज्ञांची बैठक व्हावी अशी मागणी भारताने केली आहे.

म्यानमारचे राष्ट्राध्यक्ष उ मिन ओंग लयांग उद्यापासून भारताच्या दौऱ्यावर येणार असून ते प्रधानमंत्री मोदी यांची भेट घेणार असल्याची माहिती जैस्वाल यांनी यावेळी दिली.

<><><><><>

काँगो प्रजासत्ताकात इबोलाचे ९०६ संशयित रुग्ण असून त्यातले २२३ जण मृत्यू पावले आहेत. जागतिक आरोग्य संस्थेने आज ही माहिती दिली आहे. काँगो प्रजासत्ताकात बुंदीबुग्यो प्रकारच्या इबोलाची साथ सुरु असून १२५ रुग्णांना इबोलाचीच लागण झाल्याचं नक्की झालं आहे आणि त्यातल्या १७ जणांचा मृत्यू झाल्याचं जागतिक आरोग्य संस्थेने म्हटलं आहे. या बुंदीबुग्यो प्रकारच्या इबोलाची लागण युगांडातही झाली असून त्यावर अद्याप कोणतीही लस उपलब्ध नाही.

<><><><><>

व्हाईस ॲडमिरल अजय कोचर यांनी आज अठ्ठेचाळीसावे उप नौदल प्रमुख म्हणून कार्यभार स्वीकारला. पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी असलेले कोचर, जुलै १९८८मध्ये भारतीय नौदलात रुजू झाले होते. आपल्या ३७ वर्षांपेक्षा अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी नौदलातली विविध पदं भूषवली आहेत.

<><><><><>

आय पी एल क्रिकेट स्पर्धेच्या पात्रता फेरीत आज चंडीगढ मधे गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्स नाणेफेक जिंकून फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या, ७ षटकात २ बाद ७६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

यंदा जून ते सप्टेंबरच्या कालावधीत होणारा मोसमी पाऊस सरासरीच्या ९० टक्केच पडेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. नवी दिल्लीत आज मान्सून हंगाम २०२६च्या दुसऱ्या टप्प्यातील दीर्घकालीन हवामान अंदाजाविषयी विभागाचे संचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा यांनी माध्यमांना माहिती दिली. एल निनो परिस्थितीमुळे देशात यंदाचा नैऋत्य मान्सून दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. या हंगामात भारतातल्या पावसाच्या स्थितीबद्दल ते यावेळी म्हणाले...

**होल्ड... बाईट - मृत्युंजय मोहपात्रा**

येत्या जून महिन्यात उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड आणि गुजरातच्या अनेक भागांमध्ये उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><><>//**